# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

☏ :२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com


**कालमर्यादा दि.९/११/२०१६**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१६/ 4543 दि. 06 NOV 2016

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय पदवी संस्था

विषय- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी संस्थामधील अध्यापकांना पाचव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार करीअर ॲडव्हान्समेंट योजनेचे लाभ मंजूर करण्याबाबत

संदर्भ- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/कॅस/२०१६/३६६ दिनांक २३/०८/२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने, आपल्या संस्थेतील दिनांक १६/१०/२०१५ पर्यंत वरीष्ठश्रेणी / निवडश्रेणीसाठी पात्र ठरणा-या ज्या अध्यापकांचे प्रस्ताव या कार्यालयांस सादर केलेले होते त्यातील ज्या अध्यापकांच्या हंगामी /कंत्राटी सेवा नियमित झालेल्या आहेत त्यांची खालील नमूद विवरणपत्रातील माहिती Ms-Word – DV-TTNatraj मध्ये तयार करुन est.ropune@gmail.com या मेलवर दिनांक ०९/११/२०१६ पर्यंत मेल करावी. माहिती वरीष्ठ कार्यालयांस विनाविलंब सादर करावयाची असल्यामुळे त्वरीत कार्यवाही करावी. तसेच माहिती निरंक असल्यास तसे लेखी कळवावे.

| अ.क्र. | अध्यापकांचे नांव व विद्याशाखा | ज्या शासन निर्णयान्वये/ कार्यालयीन आदेशान्वये प्रथम नियुक्ती झाली त्याचा क्रमांक व दिनांक व त्यानंतर वेळोवेळी नियुक्तीबाबत निर्गमित झालेले शासन निर्णय/कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक | वेळोवेळी निर्ममित झालेल्या शासन निर्णय / कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने नियुक्तीच्या पदावर रुजू झाल्याचा दिनांक | संस्थेचे नांव | कार्यरत कालावधी दिनांकनिहाय | ज्या शासन निर्णयान्वये सेवा नियमित केली त्याचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| | | | | | | |

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२

E-mail : dte.desk 4@gmail.com web : http://www.dte.maharashtra.gpv.in


क्रमांक :४/आस्था/कॅस/२०१६/३६६.
दिनांक 23 AUG 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई /पुणे/ नाशिक/ नागपूर /अमरावती/ औरंगाबाद.

विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी संस्थामधील अध्याकांना ५ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार करीअर अॅडव्हान्समेंट योजनेचे लाभ मंजूर करण्याबाबत..

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित व स्वायत्त पदवी संस्थांमधील अध्यापकांना ५ व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार दिनांक १६/१०/२०१५ पर्यंत वरीष्ठश्रेणी / निवडश्रेणीसाठी पात्र ठरणाऱ्या अध्यापकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन पदवी संस्थांमधील नागपूर व औरंगाबाद विभागातील अध्यापकांचे प्रस्ताव संचालनालयास प्राप्त झालेले आहेत व इतर विभागाकडून प्रस्ताव प्राप्त व्हावयचे आहेत. सदर प्रस्तावांची छाननी करताना ज्या हंगामी/कंत्राटी अध्यापकांच्या सेवा नियमित केलेल्या आहेत अशा अध्यापकांचा सेवा कालावधी दिनांकनिहाय व संस्थानिहाय नमूद करण्यात आलेला नाही.

तरी आपणांस कळविण्यात येते की, ज्या विभागांनी प्रस्ताव संचालनालयास सादर केलेले आहेत त्यांनी पदवी संस्थांमधील कंत्राटी /हंगामी अध्यापकांचा कंत्राटी सेवेतील कालावधी दिनांकनिहाय व संस्थानिहाय खालील विवरणपत्रात नमूद करुन आवश्यक कागदपत्रासह संचालनालयास सादर करावा. व ज्या विभागीय कार्यालयांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत त्यांनी संबंधित विवरणपत्रात सदर कालावधी दिनांकनिहाय व संस्थानिहाय नमूद करण्याची दक्षता घेऊन त्यानुसार विवरणपत्रे सादर करावीत.

| अ.क्र. | अध्यापकाचे नांव व विद्याशाखा | ज्या शासन निर्णयान्वये/ कार्यालयीन आदेशान्वये प्रथम नियुक्ती झाली त्याचा क्रमांक व दिनांक व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णय/कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक | वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णय / कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने नियुक्तीच्या पदावर रुजू झाल्याचा दिनांक | संस्थेचे नांव | कार्यरत कालावधी दिनांकनिहाय | ज्या शासन निर्णयान्वये सेवा नियमित केली त्याचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

( प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई